दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शुक्रवार दि.९ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १३६ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Friday 9 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 136 • Pages 4 • Rate 4 Rs

## समृद्धी महामार्गाची कल्पना कधी आली?

**मुंबई**–समृद्धी महामार्गासारखा महामार्ग असावा अशी कल्पना कधी आली? असा प्रश्न विचारण्यात आला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, याची कल्पना मी २००१ साली महाराष्ट्राच्या विधानसभेत मांडली होती. नागपूर ते मुंबई असा महामार्ग तयार करण्यात यावा, अशी माझी कल्पना होती. त्याकाळी मी कम्युनिकेशन सुपर एक्सप्रेसवे म्हटले होते, तेव्हा आयटीचा कल होता. परंतु, तेव्हा ते झाले नाही. पण जेव्हा मी २०१४ ला मुख्यमंत्री बनलो आणि या महामार्गाचे काम सुरू करण्याचे ठरवले. नागपूर ते मुंबई अशी मी सरळ रेष मारली आणि असा रोड आपल्याला हवा आहे, असे मी अधिकाऱ्यांना सांगितले. त्यावेळी विरोधकांनी शेतकऱ्यांना सांगितले की या महामार्गासाठी एक इंच जागा देऊ नका, पण मी यावर मात करत हा रस्ता पूर्ण केला.


# मराठी माणसाच्या भल्यासाठी मुंबईत ठाकरेच विजयी व्हावेत:राजू शेट्टींचा ठाकरे बंधूंना पाठिंबा

**मराठी माणसाच्या भल्यासाठी मुंबईत ठाकरेच विजयी व्हावेत, आमची त्यांना सहानुभूती असल्याचे विधान शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केले आहे. तसेच महाराष्ट्राच्या हक्काचे किती प्रकल्प गुजरातला पाठवले याची माहिती घ्यावी, म्हणजे मुख्यमंत्र्यांचे मराठीवरील प्रेम दिसून येईल, असा टोलाही शेट्टी यांनी लगावला आहे. धाराशिव येथे शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात झालेल्या आंदोलनानंतर राजू शेट्टी माध्यमांशी बोलत होते.आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांचे प्रचार सुरू झाले आहेत. तसेच राजू शेट्टी यांनी महाराष्ट्रातील इतर ठिकाणी काँग्रेसला पाठिंबा दिला असला तरी मुंबईत मात्र त्यांनी ठाकरेंना पाठिंबा दिल्याचे पाहायला मिळत आहे. आमचे वैचारिक मतभेद असले तरीही मुंबईत मराठी माणसाच्या भल्यासाठी ठाकरे बंधूच विजयी व्हावेत, असे राजू शेट्टी म्हणाले.**



**धाराशिव । प्रतिनिधी**

मुंबईवर, मराठी माणसावर प्रेम आहे, त्यांच्या विकासासाठी आपण प्रयत्न करत आहोत असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. यावर प्रतिक्रिया देताना राजू शेट्टी म्हणाले, महाराष्ट्राच्या हक्काचे प्रकल्प गुजरातला किती पाठवले त्याची माहिती घ्या म्हणजे त्यावरून मराठीवर मुख्यमंत्र्यांचे प्रेम दिसून येईल, असा टोला शेट्टी यांनी लगावला आहे. दरम्यान, राजू शेट्टी यांनी शक्तिपीठ महामार्गाला विरोध दर्शवला असून त्यांनी आज धाराशिव–सोलापूर सीमावर्ती भागात शेतकऱ्यांचे अधिवेशन घेतले. यात त्यांनी सरकारच्या धोरणांवर सडकून टीका केली आहे.दरम्यान, शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी हिंगोलीत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. हा महामार्ग हिंगोलीच्या वसमत यमी कळमनुरी तालुक्यातून जात असल्याने यासाठी शेतकऱ्यांची शेकडो एकर सुपीक जमीन हस्तांतरित केली जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येईल, असा दावा करत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली.



# समाजहिताच्या रक्षणात पोलिस व पत्रकारांची भूमिका समान

## सोशल मीडियाने सजग पत्रकारिता केल्यास ती आदर्श ठरेल –उपविभागीय पोलिस अधीक्षक श्याम पानेगावकर

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

समाजाच्या हितासाठी पोलिस व पत्रकार हे दोन्ही घटक सारखीच महत्त्वाची भूमिका बजावत असून, पत्रकारितेच्या बदलत्या प्रवाहात केवळ प्रिंट मीडियाच नव्हे तर सोशल मीडियानेही सजग व जबाबदार पावले उचलणे आवश्यक आहे. समाजहिताला केंद्रस्थानी ठेवून केली जाणारी पत्रकारिता ही आदर्श ठरेल आणि तीच पत्रकारिता जनतेच्या मनाला भावणारी ठरेल, असे प्रतिपादन उपविभागीय पोलिस अधीक्षक श्याम पानेगावकर यांनी केले.

ते पत्रकार दिनानिमित्त आयोजित पत्रकार गौरव सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. व्हॉईस ऑफ मीडिया, तालुका व शहर शाखा नायगाव यांच्या वतीने दि. ६




जानेवारी रोजी जनता हायस्कूल येथील स्व. माजी आ. बळवंतराव चव्हाण सभागृह, नायगाव येथे हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन कुंटूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर सेवानिवृत्त प्राचार्य रमेश कदम, साहित्यिक व व्याख्याती प्रा. राजेश्वरी कदम, व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे, ज्येष्ठ पत्रकार माधव मामा कोकुर्ले, शेख वहाबुद्दीन, भा. ग. मोरे सर, प्रा. डॉ. शंकरराव गडमवार, जिल्हा आरोग्य विभागाचे अध्यक्ष शिवाजी पनासे, तालुका अध्यक्ष गंगाधर ढवळे, पोर्टल विंगचे जिल्हा कार्याध्यक्ष पवनकुमार पुठेवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते .

# बीड जिल्ह्यातील रिपाइं नगरसेवक यांचा रिपाइंच्या वतीने सत्कार

## रिपाइं नगरसेवकांचे हे यश कार्यकर्त्यांच्या कष्टाचे फलित–पप्पू कागदे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाइं) बीड मध्यवर्ती कार्यालयात रिपाइं नगरसेवकांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत जनतेचा विश्वास संपादन करून यश मिळवलेल्या लक्ष्मण सिरसट(धारुर), कार्तिक कांबळे (परळी), भारत कांबळे व शीतल चक्रे (बीड), रितू सुजित वैरागे (धारुर) या नगरसेवकांचा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते पुष्पहार, शाल व फेटा बांधून त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पप्पू कागदे म्हणाले की, रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील पाच नगरसेवक निवडून आलेले आहेत. रिपाइंच्या नगरसेवकांनी मतदारांनी



टाकलेल्या विश्वासाला तडा न जावू देता, प्रामाणिकपणे काम करणे हीच खरी जबाबदारी आहे. बीड जिल्ह्यात रिपाइंची मजबूत बांधणी असल्यामुळे व पक्षाची ताकद असून कार्यकर्ते यांच्या एकजुटीमुळे हे यश शक्य झाले आहे.दरम्यान नगर सेवकांच्या सत्काराप्रसंगी युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते प्रशांत बोराडे यांनी प्रकाशित केलेल्या तथागत दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, किशोर कांडेकर, धोंडीराम सिरसट, मायाताई मिसळे, रेश्माताई जोगदंड, बापू पवार, शाहू डोळस, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, सिद्धीक फारुकी, विलास जोगदंड, संजय हनवते, धम्मा पारवेकर, अक्षय कांबळे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे, कपिल कागदे, अक्षय कोकाटे, भैय्यासाहेब साळवे, गौतम कांबळे, प्रितम चक्रे , नामदेव वाघमारे, शाम वीर, के.के.कांबळे, सुनिल कांबळे, भागवत गायसमुद्रे, बाळू माटे, सचिन वडमारे, कुमार अरुण, भैय्यासाहेब कांबळे, यांच्यासह रिपाइं पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वादळी कट्टा

### पक्षांचे ध्येय–धोरण

निवडणूक आली की
ध्येय जन्माला येते,
मतमोजणी झाली की
धोरणांची अंत्ययात्रा होते!

जनतेचे प्रश्न
जाहीरनाम्यात मोठे,
सत्तेत गेल्यावर
खिशात छोटे!

विरोधात असताना
नैतिकतेची भाषा,
सत्तेत येताच
सोयीची परिभाषा!

ध्येय एकच – सत्ता,
धोरण एकच – खुर्ची!

बाकी जनता?
फक्त पाच वर्षांनी
आठवणीत येणारी!

**–संपादक : अजय भांगे**

# सफाई कामगारांना अरेरावी कराला तर खबरदार जशास तसे उत्तर देऊ–अॅड.विकास जोगदंड

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील स्वच्छतासाठी नगर परिषदेतील सफाई कामगार पहाटे थंडीत नेमून दिलेल्या ठिकाणी स्वच्छतेची कामे करतात एखाद दुसरा कामगार कामात कसूर करत ही असेल परंतु सर सकट सफाई कामगारांना नाहक दोष देणे योग्य नसून निवडणुकीचा राग मनात धरून जर का बौद्ध,मातंग,चर्मकार,
वाल्मिक समाजातील सफाई कामगारांना सत्ताधारी पक्षातील कुठला ही नगरसेवक किंवा पदाधिकारी पदाचा रुबाब दाखवत अरेरावी करत असेल तर जशास तसे उत्तर देऊ असा इशारा भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा माजी नगरसेवक अॅड.विकास जोगदंड यांचे सह ड.मिलिंद वाघमारे, विष्णू गायकवाड, राजेशभाई कोकाटे,लखन शिंदे, महादेव वंजारे, आदींनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिला आहेनगर परिषद ही कुणाची खाजगी मालमत्ता अथवा मक्तेदारी नाही. शहराच्या हितासाठी बिलकुल आपण आपल्या पदाचा सदउपयोग करा परंतु विनाकारण



कुणाला त्रास देण्याचा प्रयत्न करत असाल अन्याय करत असाल तर मात्र आम्ही रस्त्यावर उतरु असे ही शेवटी माजी नगरसेवक ड विकास जोगदंड यांनी पत्रकातून सांगितले आहे.

# गेवराई उपनगराध्यक्षपदी सौ रेवतीताई घुबार्डे आबासाहेब काकडे,मुन्ना मोटे स्वीकृत सदस्यपदी निवड

## बदामराव पंडित,बाळराजे पवारांनी दिली धनगर समाजाला संधी

दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई नगर परिषदेवर राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित व भाजप नेते बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखाली गेवराई नगर परिषदेत भाजपने एकहाती सत्ता मिळवली. नगराध्यक्षपदी सौ गीताभाभी बाळराजे पवार यांची मोठ्या मताधिक्याने निवड झाल्यानंतर, उपनगराध्यक्षपदी सौ रेवतीताई भगवान घुबार्डे यांना संधी देण्यात आली आहे. तर स्वीकृत सदस्य पदी आबासाहेब काकडे आणि मुन्ना मोटे या दोघांची वर्णी लागली आहे. आबासाहेब काकडे यांच्या रूपाने धनगर समाजाला नगर परिषदेमध्ये प्रतिनिधित्व दिल्याने माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांचे धनगर समाज बांधवांनी आभार मानले.



गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांची मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक झाली. यावेळी भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजप नेते बाळराजे पवार यांच्या सूचनेवरून, प्रभाग क्रमांक ५ मधून विजयी झालेल्या भाजपच्या सौ रेवतीताई भगवान घुबार्डे यांची उपनगराध्यक्षपदी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. त्यासोबतच भाजपचे आबासाहेब अंकुशराव काकडे आणि मुन्ना भैया मोटे यांची स्वीकृत नगर सेवक पदी बिनविरोध निवड करण्यात आली. गेवराई नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्य पदी, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी त्यांचे एकनिष्ठ सहकारी माजी नगरसेवक अंकुशराव काकडे यांचे चिरंजीव आबासाहेब अंकुशराव काकडे यांच्या माध्यमातून घनगर समाजाला संधी देण्यासाठी त्यांचा नावाची शिफारस केली. त्यास भाजपा नेते बाळराजे पवार यांनीही तात्काळ पाठिंबा दिला. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार या दोन्ही नेत्याच्या सामंजस्यपणामुळे आता गेवराई नगर परिषद सभागृहात विविध समाजाला नगरसेवक म्हणून प्रतिनिधित्व मिळाले आहे.मुन्ना मोटे यांच्या रूपाने मराठा तर आबासाहेब काकडे यांच्या रूपाने धनगर समाजाला सत्तेत सहभागी करून काम करण्याची संधी दिल्याबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांचे सर्व समाज बांधवांकडून आभार व्यक्त करण्यात येत आहेत. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा भाजप नेते बाळराजे पवार, जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, नगराध्यक्षा सौ गीताभाभी बाळराजे पवार, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, युवानेते रोहित पंडित, युवानेते शिवराज पवार आदींनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपा गटनेते ड राजेंद्र राक्षसभुवनकर यांच्यासह सर्व नगरसेवक भाजप पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. निवडीनंतर गुलाल उधळून, ढोलीबाजा वाजवत कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष केला.

# संपादकीय

## पश्चिमघाटाचा संरक्षक

परदेशातील उच्च पदाच्या नोकऱ्या सोडून आपल्या ज्ञानाचा वापर देशासाठी करणाऱ्यांमध्ये माधव गाडगीळ यांचे नाव महत्त्वाचे. पश्चिम घाट संरक्षण-संवर्धनासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढणाऱ्या पर्यावरणशास्त्रज्ञ माधवरावांनी अखेरचा निरोप घेतला. पश्चिम घाट संवर्धन आणि संरक्षण हीच त्यांना खरी आदरांजली.पश्चिम घाटांच्या संवर्धनासाठी दूरदर्शी दृष्टिकोनासाठी ओळखले जाणारे ज्येष्ठ पर्यावरणवादी माधव गाडगीळ यांचे पुण्यात निधन झाले. दीर्घकालीन आजाराशी सुरू असलेली झुंज अखेर संपली. भारतात तळागाळातील पर्यावरण चळवळीला आकार देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. काही वर्षांपूर्वी त्यांनी पश्चिम घाटातील पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांमुळे गंभीर नैसर्गिक आपत्ती येतील, असा इशारा दिला होता. केरळमधील वायनाडसारख्या दुर्घटनांचा इशारा त्यांनी अगोदरच दिला होता. पश्चिम घाटात विकास, खाणी करताना आपल्याला काय किंमत मोजावी लागेल याची जाणीव त्यांनी फार अगोदरच करून दिली होती. गोव्यातील खाणी आणि पर्यावरण हा मुद्दा जेव्हा पुढे आला, तेव्हा त्यांनी खाणीतून संपत्ती मिळेल; परंतु गोव्याचे वायनाड व्हायला वेळ लागणार नाही, असा इशारा दिला होता. सरकार कुणाचे आहे आणि सत्तेत कोण आहे, याचा त्यांना कधीच फरक पडला नाही. त्यांनी कायम सामान्य माणूस आणि पर्यावरण रक्षणाची पताका उंचावली; परंतु माधवरावांना संयुक्त राष्ट्र संघाचा पर्यावरण क्षेत्रातला सन्मान जेव्हा मिळाला, तेव्हा त्यांच्याविषयी भारतातील अनेकांना समजले. २०११ मध्ये त्यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आलेल्या प्रशंसित गाडगीळ अहवालात उद्योग आणि हवामान संकटाच्या वाढत्या दबावादरम्यान पश्चिम घाट सारख्या पर्यावरणीयदृष्ट्या नाजूक प्रदेशांचे संरक्षण करण्याची शिफारस करण्यात आली होती. गाडगीळ समितीच्या अहवालातील बहुतेक शिफारशी अद्याप अमलात आणल्या गेलेल्या नाहीत; परंतु त्यानंतरच्या आपत्तींनी त्यांची दूरदृष्टी सिद्ध केली. गाडगीळ यांना २०२४ मध्ये संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (यूएनईपी)कडून 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०२१ मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत गाडगीळ म्हणाले होते, की पश्चिम घाट आणि हिमालयात वारंवार येणाऱ्या आपत्ती अभूतपूर्व नाहीत. जंगलतोड आणि पर्वत उतारांशी छेडछाड केल्यामुळे अशा घटना वाढल्या आहेत. पश्चिम घाटापेक्षा हिमालय अधिक नाजूक असल्याचे सांगून त्यांनी भूस्खलन आणि धुपाच्या धोक्यांकडेही लक्ष वेधले. त्यांनी सात पुस्तके आणि किमान २२५ वैज्ञानिक पेपर्स लिहिले. एक संवेदनशील शास्त्रज्ञ म्हणून त्यांनी समाजाची दिशा बदलण्यात योगदान दिले, त्याचे त्यांना समाधान होते. २०११ मध्ये, पश्चिम घाट पर्यावरणतज्ज्ञ पॅनेलचे अध्यक्ष म्हणून, गाडगीळ यांनी १ लाख २९ हजार ३७ चौरस किलोमीटर क्षेत्रापैकी ७५ टक्के क्षेत्र पर्यावरण-संवेदनशील म्हणून घोषित करण्याची शिफारस केली. या शिफारशीला अनेक राज्यांनी खूप कठोर मानून विरोध केला. त्यानंतर कस्तुरीरंगन समितीने हे क्षेत्र ५० टक्क्यांपर्यंत कमी केले आणि कालांतराने त्यांच्या शिफारसी सौम्य केल्या गेल्या.पश्चिम घाटाच्या पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांबाबत अंतिम अधिसूचना अद्याप जारी केलेली नाही. केरळमधील वायनाडसारखे क्षेत्र, जिथे २०२४ मध्ये भूस्खलनात शेकडो लोकांचा मृत्यू झाला होता, ते गाडगीळ पॅनेलच्या शिफारशींमध्ये समाविष्ट करण्यात आले. गाडगीळ यांनी केवळ पश्चिम घाट आणि सायलेंट व्हॅलीच्या संवर्धनात महत्त्वाची भूमिका बजावली नाही, तर भारतीय पर्यावरणीय विज्ञानाला एक नवीन दिशा दिली. गाडगीळ यांना लहानपणापासूनच निसर्ग आणि पक्ष्यांमध्ये खूप रस होता. पक्षीनिरीक्षक असलेले त्यांच्या वडिलांनी पर्यावरणशास्त्राबद्दल गाडगीळ यांच्या कुतूहलाला आणखी चालना दिली. विज्ञान हे केवळ शैक्षणिक प्रयोगशाळांसाठी नाही, तर समाजासाठी असले पाहिजे असा त्यांचा विश्वास होता. गाडगीळ यांनी भारतीय विज्ञान संस्थेत पर्यावरण विज्ञान केंद्राची स्थापना केली आणि आदिवासी, शेतकरी आणि मच्छीमारांच्या सहकार्याने काम केले. अनियंत्रित खाणकाम आणि जंगलतोडीमुळे भूस्खलन, पूर आणि दीर्घकालीन नुकसान होईल, असा इशारा गाडगीळ यांनी दिला होता. काही वर्षांनंतर केरळसह देशाच्या अनेक भागांत भूस्खलन आणि पूर आल्यावर त्यांचे भाकीत खरे ठरले.माधव गाडगीळ ांचे जीवन सिद्ध करते, की वैज्ञानिक विचार आणि धोरण बदलासाठी संयम आणि लोकसहभाग आवश्यक आहे. गाडगीळ केवळ एक शास्त्रज्ञ नव्हते, ते एक लेखक, शिक्षक, मार्गदर्शक आणि समाजसुधारकदेखील होते. आधुनिक विज्ञान आणि पारंपरिक ज्ञान दोन्ही एकत्रित केले. गाडगीळ यांचे जीवन विज्ञान, शिक्षण आणि समाजसेवेसाठी समर्पित होते. त्यांनी त्यांच्या सहा दशकांच्या वैज्ञानिक कारकिर्दीत पर्यावरण संवर्धन क्षेत्रात असाधारण योगदान दिले. लहानपणी त्यांनी वडिलांसोबत जलविद्युत प्रकल्प आणि जंगलतोड यांसारख्या समस्या जवळून पाहिल्या. औद्योगिक विकासाची किंमत पर्यावरणीय विनाश आणि स्थानिक लोकांच्या दुःखाच्या स्वरूपात मोजावी का? असा प्रश्न ते कायम करीत. त्यामुळे त्यांना अनेकांनी विकासविरोधक ठरवले; आपल्या सिद्धांताला वैज्ञानिक आधार आहे आणि सामान्य लोकांचे कल्याण हाच आपल्या विचाराचा मूळ पाया आहे, यावर ते ठाम होते.भारताच्या पहिल्या 'बायोस्फीअर रिझर्व्ह'च्या स्थापनेत गाडगीळ यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. वनवासी, मच्छीमार आणि शेतकऱ्यांसोबत काम करून त्यांनी पर्यावरणीय संवर्धनासाठी एक मॉडेल विकसित केले. पुण्यात जन्मलेल्या गाडगीळ यांचे शिक्षण मुंबई आणि हार्वर्ड येथे झाले. तिथे त्यांनी पर्यावरणशास्त्रात पीएच.डी. मिळवली आणि नंतर ते अध्यापन करू लागले. १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला, त्यांनी आणि त्यांच्या पत्नी सुलोचना (ज्यांनी हार्वर्डमधून गणितात पीएच.डी. देखील मिळवली) यांनी अमेरिकेतील शास्त्रज्ञांना मिळणारे विशेषाधिकार आणि प्रतिष्ठा सोडून भारतात काम करण्यासाठी स्वतःला समर्पित करण्याचा निर्णय घेतला. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'चे संचालक सतीश धवन यांनी त्यांची बुद्धिमत्ता आणि आवड ओळखली आणि त्यांना संस्थेच्या बंगळूरु कॅम्पसमध्ये दोन्ही पदे देऊ केली. तिथे सुलोचना यांनी वातावरणीय विज्ञान केंद्र स्थापन करण्यास मदत केली आणि पावसाळ्यावर काही उल्लेखनीय काम केले. माधवरावांनी पर्यावरण विज्ञान केंद्राची स्थापना केली. गणितीय पर्यावरण शास्त्रापासून पर्यावरणीय क्षेत्रकार्यात संक्रमण केले होते. त्यांनी बांदीपूर राष्ट्रीय उद्यानात हत्तींच्या वर्तनाचा अभ्यास केला. गाडगीळ समितीच्या अहवालात पश्चिम घाटातील संवेदनशील जंगले आणि डोंगर उतारांना खाणकाम आणि इतर विध्वंसक कारवायांपासून संरक्षण करण्याची शिफारस करण्यात आली होती आणि संबंधित बाबींवरील निर्णयांमध्ये स्थानिक लोक आणि पंचायतींनी सहभागी होण्याची गरज यावर भर देण्यात आला होता. कंत्राटदार, राजकारणी आणि नोकरशहा या कुप्रसिद्ध त्रिकुटांनी गाडगीळ अहवालाला जोरदार विरोध केला होता; जर तो अहवाल लागू केला असता, तर केरळ, कर्नाटक आणि गोवा यांसारखी राज्ये पुराच्या विध्वंसातून वाचली असती. गाडगीळ यांच्याकडे खोल सामाजिक जाणीव होती. त्यांचे वडील, प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांना मानवी हक्कांमध्ये खूप रस होता. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रभावित होते. माधवरावांच्या पत्नी, प्रसिद्ध हवामानशास्त्रज्ञ सुलोचना गाडगीळ यांचे पाच महिन्यांपूर्वीच निधन झाले. माधवरावांच्या निधनाने देशाने केवळ एक महान शास्त्रज्ञच नाही, तर पर्यावरण आणि समाज यांच्यात पूल बांधणारा एक शक्तिशाली आणि संवेदनशील आवाजही गमावला.

# बेकारांना गुन्हेगारीकडे आणि सुखी कुटुंबांना दारिद्र्याकडे ढकलणाऱ्या मटका माफियाला कधी पकडणार साहेब?

## मटक्यासोबत वर्दी? पोलिस कारवाईवरच प्रश्नचिन्ह

दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

केज शहर व तालुक्यात मटका जुगाराने अक्षरशः धुमाकूळ घातला असून बेकार तरुणांना गुन्हेगारीच्या दलदलीत आणि सुखी कुटुंबांना दारिद्र्याच्या खाईत ढकलण्याचे काम मटका माफिया करत आहे. मात्र इतक्या उघडपणे सुरू असलेल्या या अवैध धंद्यावर अद्याप ठोस कारवाई होत नसल्याने मटक्यासोबत वर्दी? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.केज शहरातील चौकाचौकात, गल्लीबोळात, चहाच्या टपऱ्यांपासून पानपट्ट्यांपर्यंत मटका खुलेआम सुरू असल्याचे चित्र आहे. दररोज हजारो रुपयांची उलाढाल होत असताना गरीब कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. अनेक युवक कर्जबाजारी होऊन गुन्हेगारीकडे वळत असून सामाजिक शांतता धोक्यात आली आहे.विशेष म्हणजे मटक्याचे अड्डे, बुकी व एजंट यांची माहिती सर्वसामान्य नागरिकांनाच माहीत असताना पोलिस प्रशासनाला ती कशी कळत नाही? की कारवाई न करण्यामागे अदृश्य हात काम करत आहेत, असा संशय आता उघडपणे व्यक्त होत आहे.केज शहर व तालुक्यातील नागरिकांनी मटका माफियावर तात्काळ कडक कारवाई करावी, बुकी व त्यांच्या पाठीराख्यांवर गुन्हे दाखल करावेत अशी जनतेतून मागणी दिवसेंदिवस होत आहे जर कडक कारवाई केली नाही तर केज शहर तथा तालुक्यातील गुन्हेगारीचे प्रमाण महाराष्ट्रात प्रथम स्थांनी येईल .




# आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शाकेर,सय्यद,श्रीमती देवकते,गायकवाड या शिक्षकांचा सत्कार सोहळा संपन्न

## दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्कूल डेही उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता

परळी । प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची शाळेतील शिक्षक सय्यद शाकेर व इतर पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक गुणवंताची खाण असल्याचे यावेळी रानबा गायकवाड यांनी सांगितले.

परळी शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जी.बी.शेख होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक अन्वर सर,जाफर सर,सहारा सेवाभावी संस्थेचे मोईन फारुखी,आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षिका




श्रीमती देवकते मॅडम,शिक्षक गौरव पुरस्कार विजेते गायकवाड सर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी रानबा गायकवाड,माजी मुख्याध्यापक अन्वर सर,अनिस बाजी , शाकेर सर, गायकवाड सर,देवकते मॅडम,मुख्याध्यापक शेख सर आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले.

याच वेळी स्कुल डे च्या निमित्ताने इयत्ता दहावीच्या शिक्षक बनलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.तसेच काही विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी आपले विचार मांडले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक उर्दु माध्यमाचे मुख्याध्यापक इम्रान सर यांनी केले.सुत्रसंचलन गर्जे मॅडम व सोम्मया बाजी यांनी केले.कार्यक्रमास शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, विद्यार्थ्यांथिनी,पालक उपस्थित होते.

# बप्पासाहेब परजणे यांचा अनेक कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीमध्ये जाहीर प्रवेश

## शिवछत्र परिवार विजय राजे व जिल्हाध्यक्ष बळी आप्पा गावते यांच्या उपस्थितीत प्रवेश

दैनिक वादळ वार्ता

बीड । प्रतिनिधी:

खालापुरी पंचायत समिती गण व रायमोहा सर्कल मध्ये गेल्या अनेक वर्षापासून संघटक वाढीसाठी व पक्षासाठी रात्रंदिवस काम करणारे अनेक युवा तरुण आज शिवछत्र परिवारावर आमदार विजयसिंह राजे पंडित यांच्यावर विश्वास ठेवून युवक जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी बळी आप्पा गावते यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करून येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक मध्ये जोमाने काम करू व जिल्हा परिषद असो व पंचायत समिती या दोन्ही ठिकाणी राष्ट्रवादी पक्षाची ताकद येणाऱ्या काळामध्ये काम करत राहू असा विश्वास पक्षसृष्टीकडे दाखवला आहे गेल्या अनेक वर्षापासून बाबासाहेब परजणे हे विद्यार्थी संघटना तालुकाध्यक्ष या पदाच्या माध्यमातून अनेक तरुणांना वेळोवेळी मार्गदर्शन व मदत करत आहेत कोरोना काळामध्ये सॅनिटायझर असो किंवा राशन किट या माध्यमातून खलापुरी गणामध्ये अनेक गरजू लोकांना मदत करून खालापुरी गणातील युवा तरुणाचा व नागरिकांचा विश्वास जिंकत आहे एवढेच नव्हे तर निराधार योजनेच्या माध्यमातून अनेक माता भगिनींना पगारही चालू करून दिला आहे त्यामुळे बप्पासाहेब परजणे व त्यांचे अनेक सहकारी यांच्यामुळे राष्ट्रवादीची ताकद नक्कीच वाढली आहे आणि येणाऱ्या काळामध्ये या सर्वांचा पक्षाला नक्कीच फायदा होणार आहे.



# हिवाळ्यात गुळ साठवण्यासाठी 'या' सोप्या ट्रिक्स करा फॉलो

दैनिक वादळ वार्ता

गूळ केवळ खाण्यास स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. हिवाळ्यात गूळ खाल्ल्याने शरीराचे अनेक समस्यांपासून रक्षण होते आणि तंदुरुस्त राहते. बहुतेक घरांमध्ये चहा, मिठाई, लाडू यांसारखे पदार्थ तयार करण्यासाठी याचा वापर केला जातो. परंतु थंड हवामानात एक सामान्य समस्या म्हणजे गूळ कठीण, कोरडा होणे तसेच तो तोडणे किंवा विरघळणे कठीण होते. खरे तर तापमानात घट आणि कोरडी हवा यांमुळे मऊ गूळ लवकर दगडासारखा कडक होतो, त्यामुळे त्याचा वापर करणे कठीण होते. जर तुम्हीही या समस्येने त्रस्त असाल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. आज आम्ही तुम्हाला ५ सोप्या टिप्स सांगणार आहोत, ज्या हिवाळ्यात खराब होणार नाहीत किंवा चिकट होणार नाहीत. चला जाणून घेऊया.

गुळ हा नैसर्गिक आणि पौष्टिक गोड पदार्थ असून आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर मानला जातो. गुळामध्ये लोह, कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस यांसारखी खनिजे भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे रक्तातील हिमोग्लोबिन वाढविण्यास मदत होते आणि रक्तक्षय टाळण्यास गुळ उपयुक्त ठरतो. गुळ खाल्ल्याने शरीराला त्वरित ऊर्जा मिळते आणि थकवा कमी होतो. विशेषतः हिवाळ्यात गुळ शरीराला उष्णता देतो, त्यामुळे सर्दी-खोकला आणि थंडीपासून संरक्षण मिळते. गुळ पचनसंस्थेसाठीही फायदेशीर असून जेवणानंतर थोडा गुळ खाल्ल्यास पचनक्रिया सुधारते आणि पोट साफ होण्यास मदत होते.गुळामध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत करतात, त्यामुळे यकृत आणि शरीराची स्वच्छता होते. गुळ श्वसनसंस्थेसाठी उपयुक्त असून दमा, खोकला, घसा दुखणे यांसारख्या त्रासांवर आराम मिळतो. महिलांसाठी गुळ विशेष



लाभदायक मानला जातो, कारण मासिक पाळीतील वेदना कमी करण्यास आणि हार्मोन्स संतुलित ठेवण्यास मदत करतो. तसेच गुळ त्वचा निरोगी ठेवतो आणि केस मजबूत होण्यास सहाय्य करतो. मात्र मधुमेह असलेल्या व्यक्तींनी गुळाचे सेवन मर्यादित प्रमाणात आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने करावे.

अधिक आरोग्यदायी पर्याय योग्य प्रमाणात गुळ खाल्ल्यास तो साखरेपेक्षा अधिक आरोग्यदायी पर्याय ठरतो आणि शरीराला नैसर्गिक पोषण देतो. गूळ खराब होऊ नये म्हणून ते पूर्णपणे हवाबंद काचेच्या किंवा स्टेनलेस स्टीलच्या कंटेनरमध्ये ठेवा. या डब्यात गूळ ठेवल्याने चव खराब होत नाही. गूळ नेहमी प्लास्टिकच्या बॉक्समध्ये ठेवणे टाळा, कारण त्यातून ओलावा हळूहळू बाहेर पडू शकतो आणि कालांतराने गूळ खराब होऊ शकतो. जर ओलाव्यामुळे गूळ चिकट किंवा ओला झाला असेल तर आपण तो त्वरित उन्हात ठेवला पाहिजे. यामुळे गुळाची चिकटपणा दूर होईल आणि चवही परिपूर्ण होईल. गूळ मोठ्या तुकड्यात ठेवण्याऐवजी तो नेहमी लहान तुकड्यांमध्ये ठेवावा. त्यामुळे गूळ लवकर कडक होत नाही व चवीला परिपूर्ण राहतो. याशिवाय लहान तुकडे वापरण्यास देखील सोपे आहेत.

**अति सेवन केल्यास काही तोटे**

गूळ खराब होऊ नये म्हणून तमालपत्र किंवा लवंग सोबत ठेवू शकता. यामुळे गूळ चिकट होणार नाही आणि सुगंधही कायम राहील. याशिवाय कीटकांपासून संरक्षण करण्यासाठी ही टीप देखील खूप प्रभावी ठरते. गूळ कडक होण्यापासून रोखण्यासाठी आपण फ्रीजमध्ये देखील ठेवू शकता. हे गुळाला लवकर ओलावा गमावण्यापासून प्रतिबंधित करेल आणि कठोर होण्यापासून प्रतिबंधित करेल. तसेच ते टेस्ट फ्रीजमध्ये ठेवल्याने गुळात चिकटपणा येत नाही. गुळ हा नैसर्गिक गोड पदार्थ असला तरी त्याचे अति सेवन केल्यास काही तोटे होऊ शकतात. गुळामध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्यामुळे तो जास्त खाल्ल्यास वजन वाढण्याची शक्यता असते. विशेषतः बैठ्या जीवनशैलीतील लोकांनी गुळाचे प्रमाण मर्यादित ठेवणे आवश्यक आहे. मधुमेह असलेल्या व्यक्तींनी गुळाचे सेवन काळजीपूर्वक करावे, कारण तो रक्तातील साखरेची पातळी वाढवू शकतो. नैसर्गिक असल्यामुळे गुळ पूर्णपणे सुरक्षित आहे असा गैरसमज अनेकदा केला जातो, पण अति प्रमाणात सेवन केल्यास तोही हानिकारक ठरू शकतो.

**रसायनमिश्रित गुळामुळे पोटाचे विकार**

गुळ उष्ण प्रवृत्तीचा असल्यामुळे जास्त प्रमाणात खाल्ल्यास ॲसिडिटी, छातीत जळजळ, पोटदुखी किंवा जुलाब होण्याची शक्यता असते. काही लोकांना गुळामुळे सर्दी, कफ किंवा घशात खवखव जाणवू शकते. बाजारात मिळणाऱ्या अशुद्ध किंवा रसायनमिश्रित गुळामुळे पोटाचे विकार होऊ शकतात. तसेच गुळ दातांना चिकटत असल्याने दात किडण्याचा धोका वाढतो, जर योग्य तोंडाची स्वच्छता राखली नाही तर. त्यामुळे गुळ आरोग्यदायी असला तरी योग्य प्रमाणात आणि शुद्ध स्वरूपातच सेवन करणे अधिक सुरक्षित आणि फायदेशीर ठरते

## अहिल्यानगर पत्रकार संघातर्फे पत्रकारांचा सन्मान

# समाजाला दिशा देण्यात पत्रकारांचे मोठे योगदान-आयुक्त यशवंत डांगे





दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

पत्रकारिता हाच लोकशाहीचा कणा आहे. पत्रकारितेकडे एखाद्या संस्थेतील नोकरी म्हणून न पाहता समाजसेवा म्हणून पाहिले पाहिजे. समाजाला दिशा देण्यात पत्रकारांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित मराठी पत्रकाराच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा होते. यावेळी व्यासपीठावर दै. सार्वमतचे संपादक अनंत पाटील, अहमदनगर पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल लगड, सचिव संदीप रोडे, ज्येष्ठ पत्रकार रियाज शेख, अशोक झोटिंग, कैलास ढोले आदी उपस्थित होते.आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करीत दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, आपल्या सभोवताली घडणाऱ्या वेगवेगळ्या घटना आणि त्याची इन्तभूत माहिती समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार करतात. पत्रकारिता हा सत्याचा धर्म आहे. तो सत्याचा धर्म जागविण्यासाठी पत्रकार धडपड करीत असतो. पत्रकारितेकडे नोकरी म्हणून पाहता समाजसेवेचे माध्यम म्हणून पाहणे गरजेचे आहे. लेखणीला नेहमीच सत्याची धार असली पाहिजे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात वेगवेगळ्या माध्यमातून बातमीदारी केली जाते परंतु, त्यामध्ये विश्वासार्हता टिकवणे तितकेच गरजेचे आहे. त्यासाठी पत्रकारांनी लेखणीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. महापालिका पत्रकारांच्या विविध उपक्रमासाठी नेहमीच सहकार्य करीत असते. यापुढेही महापालिका सहकार्य करेल, अशी ग्वाही आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.आनंद पाटील म्हणाले की, माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये पत्रकारितेचे स्वरूप बदलत आहे. तरीपण पत्रकारांनी आपल्या लेखणीतील ताकद त्यामधून वारंवार सिद्ध केली पाहिजे. लेखणीमध्ये नावीन्यता असणे गरजेचे आहे.अध्यक्षीय भाषणामध्ये सुभाष गुंदेचा म्हणाले की, पूर्वी मोजकीच वर्तमानपत्र होते. त्यामुळे पत्रकारांची संख्याही कमी होती, परंतु आज पत्रकारितेत वेगवेगळी माध्यम निर्माण झाली असून पत्रकारांची संख्या वाढली आहे. पत्रकारांचा समाजामध्ये दरारा निर्माण करायचा असेल तर आपली एकजूट असणे आवश्यक आहे. आपण एकत्र राहिलो तरच आपल्या पत्रकारितेला धार राहील. यावेळी दैनिक राज आनंदचे मुख्य संपादक विठ्ठल शिंदे,विविध वर्तमानपत्राचे बातमीदार, उपसंपादक यांच्यासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक अहिल्यानगर पत्रकार संघाचे सचिव संदीप रोडे यांनी केले. लोकमतचे मुख्य उपसंपादक सुदाम देशमुख यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. सूर्यकांत वरकड यांनी केले.

## रेणुकामाता मल्टीस्टेटचे वार्षिक कॅलेंडर प्रकाशित



दैनिक वादळ वार्ता
शेवगाव । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुकामाता देवस्थानात आयोजित विशेष सोहळ्यात बँकिंग क्षेत्रात नावलौकिक मिळविलेल्या श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेच्या सन २०२६ च्या अद्ययावत दिनदर्शिकेचे प्रकाशन मागील मंगळवारी उत्साहात पार पडले.
बँकिंग व फायनान्स क्षेत्राशी संबंधित विविध उपयुक्त माहिती, आर्थिक मार्गदर्शन व संदर्भयुक्त मजकूर असलेल्या या दिनदर्शिकेचे प्रकाशन रेणुका परिवाराचे ज्येष्ठ सदस्य, पाथर्डी नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसेवक बजरंग घोडके यांच्या हस्ते करण्यात आले.
यावेळी संस्थेचे प्रवर्तक ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. प्रशांत चंद्रकांत भालेराव, डॉ. अरविंद पोटफोडे, प्रा. जनार्दन लांडे पाटील, बाळासाहेब चौधरी, वे.शा. सं. तुषार देवा, श्रीमंत घुले, राहुल वाघमारे यांच्यासह रेणुका परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी पाथर्डी नगर परिषदेच्या निवडणुकीत विक्रमी मतांनी विजय मिळविल्याबद्दल नवनिर्वाचित नगरसेवक बजरंग घोडके यांचा डॉ. प्रशांत भालेराव नाना यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या सोहळ्यानिमित्त दिवसभर अनेक मित्रपरिवार व भाविकांनी रेणुका आईसाहेबांचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा आस्वाद घेतला

## लोकशाही बळकट करण्यासाठी मतदारांचे योगदान महत्त्वाचे-मुख्य निवडणूक निरीक्षक आदित्य जीवने

### मनपा स्वीप समितीच्या वतीने मतदार जनजागृतीचा आराखडा सादर



दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

महानगरपालिका निवडणूक ही लोकशाही बळकट करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असून, या प्रक्रियेत मतदारांचे योगदान महत्त्वाचे आहे. मनपा स्वीप समितीचे विविध नियोजित उपक्रम हे निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी निश्चितच साहाय्यभूत ठरतील, असे प्रतिपादन मुख्य निवडणूक निरीक्षक आदित्य जीवने यांनी केले.
महिला व नवमतदार यांचा मतदानातील सहभाग वाढविण्यासाठी विशेष उपक्रम आयोजित करावेत, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.
अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने मनपा स्वीप समितीच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी राबवावयाच्या विविध उपक्रमांचा आराखडा व अहवाल, मुख्य निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांच्या माध्यमातून नुकताच निवडणूक निरीक्षकांना सादर करण्यात आला. मतदारांचे नियोजनबद्ध शिक्षण आणि निवडणूक सहभागावर आधारित विविध उपक्रमांचा यात समावेश आहे. यावेळी पथकातील अतिरिक्त जिल्हाधिकारी (जळगाव) श्रीमंत हरकर व स्वीप समिती सदस्य उपस्थित होते.
लोकशाहीला समृद्ध करणाऱ्या मतदान प्रक्रियेतील विविध नावीन्यपूर्ण उपाययोजना देखील येत्या काळामध्ये प्रभावी ठरून, निर्भयपणे व निरपेक्ष वृत्तीने मतदान करण्यासाठी मतदारांना प्रोत्साहित करतील, असा विश्वास श्रीमंत हरकर यांनी यावेळी व्यक्त केला.
राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे, स्वीप नोडल अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अशोक साबळे, मतदारदूत डॉ. अमोल बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्वीप आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये मतदार जनजागृतीसाठी रॅली, शोभायात्रा, मिरवणूक, सेल्फी पॉइंट, पथनाट्य, विविध प्रकारच्या स्पर्धा तसेच नवमतदार जागृती, दिव्यांग, तृतीयपंथी व वंचित घटकातील महिलावर्गासाठी विशेष उपक्रम, ईव्हीएम व व्हीव्हीपॅटविषयक जनजागृती शिबिरे, मतदार जनजागृती शपथ, संकल्पपत्र, बाईक रॅली, दृकश्राव्य निर्मिती, समाजमाध्यमांचा वापर, 'आयुक्तांशी संवाद', मनपा दौड आणि मतदार जागृतीचे हळदीकुंकू आदी विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

## ज्ञानज्योती संमेलनात मीराताई रामदास सुरळकर यांना सावित्रीबाई फुले समाजभूषण पुरस्कार प्रदान



दैनिक वादळ वार्ता
रोहा । प्रतिनिधी

महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ज्ञानज्योती संमेलन २०२६ अंतर्गत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात रोहा (जि. रायगड) येथील मीराताई रामदास सुरळकर यांना त्यांच्या प्रेरणादायी आणि सामाजिक कार्याची दखल घेत 'सावित्रीबाई फुले समाजभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.समाजासाठी ज्ञानज्योत प्रज्वलित ठेवणाऱ्या आणि समाजहितासाठी सातत्याने कार्यरत राहणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याच्या उद्देशाने हा प्रतिष्ठित पुरस्कार दिला जातो. मीराताई सुरळकर यांनी समाजातील सकारात्मक बदलासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत निवड समितीने त्यांची निवड एकमताने केली.
हा सन्मान सोहळा शनिवार, ३ जानेवारी २०२६ रोजी पुणे येथील पत्रकार भवनात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन रणरागिणी मल्टीपर्पज फाउंडेशन, अहिल्यानगर आणि आनंद आधार बहुउद्देशीय सामाजिक संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानज्योती संमेलनाच्या निवड समितीचे अध्यक्ष उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी मीराताई सुरळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सामाजिक योगदानाला खरी प्रेरणा आणि समाजसेवेचे उत्तम उदाहरण असे म्हटले.
कार्यक्रमाच्या शेवटी मीराताई सुरळकर यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आणि उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक कार्याला सलाम करत उत्स्फूर्त टाळ्यांचा कडकडाट केला.

## नादरपूर येथे कृषी विभाग व ग्रामपंचायतीच्या वतीने पोकरा प्रकल्प अंतर्गत कार्यशाळा संपन्न



दैनिक वादळ वार्ता
पिशोर । प्रतिनिधी

दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी कृषी विभाग व ग्रामपंचायत नादरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) तसेच शासनाच्या सर्व महत्त्वाकांक्षी कृषी योजनांच्या अनुषंगाने एक दिवसीय मार्गदर्शन व जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेत शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती, पोकरा प्रकल्पातील घटक योजना, लाभ घेण्याची प्रक्रिया तसेच प्रकल्प अंमलबजावणीत सहभागी प्रत्येक घटकाची जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यशाळेत मा. तालुका कृषी अधिकारी संदीपजी शिरसाठ, मंडळ कृषी अधिकारी तेजसजी नंदवालकर व उपकृषी अधिकारी दीपकजी बिरारे यांनी शेतकऱ्यांना सखोल व उपयुक्त मार्गदर्शन केले. यावेळी शेतकऱ्यांच्या विविध अडचणी व प्रश्नांच्या अनुषंगाने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असून, उपस्थित अधिकाऱ्यांनी प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. तसेच शासनाच्या महाकृषी ॲपचे महत्त्व शेतकऱ्यांना समजावून सांगत प्रत्यक्ष ॲप डाउनलोड करून देण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांना योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया व विविध सेवांचा लाभ डिजिटल माध्यमातून घेणे सुलभ होणार आहे.
कार्यक्रमास सहाय्यक कृषी अधिकारी मनीषजी राठोड, अरुणजी चव्हाण, ग्रामपंचायत पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, ग्राम कृषी विकास समितीचे सदस्य, प्रगतशील शेतकरी तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यशाळेमुळे नादरपूर व परिसरातील शेतकऱ्यांमध्ये कृषी योजनांबाबत जागृती वाढून आधुनिक व शाश्वत शेतीकडे वाटचाल होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# पहिला राजिनामा द्या आणि बिनविरोध निवडीवर बोला मंत्री आशिष शेलार यांचा उद्धव ठाकरे यांना टोला

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

जे उध्दव ठाकरे स्वतः १४ मे २०२० ला बिनविरोध निवडून आले, तेच उध्दव ठाकरे आज सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन महायुतीच्या बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेवकांच्या निवडीवर प्रश्न चिन्ह उपस्थित करीत आहेत. आधी तुम्ही राजिनामा द्या, मगच बिनविरोध निवडीवर बोला, असा टोला भाजपाचे मुंबई निवडणूक प्रभारी आणि मंत्री ॲड आशिष शेलार यांनी आज येथे केले.
मागाठाणे येथील वार्ड क्रमांक तीन चे महायुतीचे उमेदवार प्रकाश दरेकर यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत बोलताना मंत्री अशी शेलार यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. यावेळी आमदार प्रविण दरेकर, संजय उपाध्याय माजी खासदार गोपाळ शेट्टी आणि महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.
मुंबई महापालिका निवडणुकीच्या प्रचारात आता रंग भरत असून आज रविवार मुंबईकरांसाठी प्रचारवार ठरला. भाजपाचे मुंबई महापालिका निवडणुकीत प्रभारी मंत्री आशिष शेलार यांनी ही झंझावाती दौरा करीत महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार केला.या दौऱ्याची सुरुवात वांद्रे पश्चिम विधानसभा मतदारसंघातील वॉर्ड क्र. ९४ येथून झाली. येथे महायुतीच्या उमेदवार पल्लवी सरमळकर यांच्या निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन मंत्री आशिष शेलार यांनी केले, यावेळी गृहराज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते. त्या नंतर वांद्रे पश्चिम विधानसभा क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०१ मध्ये महायुतीच्या उमेदवार अनुश्री घोडके यांच्या प्रचारार्थ पदयात्रेदरम्यान मंत्री आशिष शेलार यांनी थेट नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या, अपेक्षा आणि स्थानिक प्रश्न जाणून घेतले.वांद्रे पश्चिम विधानसभा क्षेत्रात आयोजित महायुतीच्या कार्यकर्ता मेळाव्यामध्ये सविस्तर संवाद साधला. यावेळी वांद्रे पश्चिममधील महायुतीच्या सहाही उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी प्रचाराची दिशा, सभांचे नियोजन, बूथनिहाय तयारी आणि जनसंपर्क अधिक प्रभावी कसा करता येईल याबाबत आशिष शेलार यांनी मार्गदर्शन केले.



# मलकापूर येथे पत्रकार दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्काराने युवा कलाकार सुदाम लिंबराज मासाळ सन्मानित

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

दर्पण दिनानिमित्त हिंदी मराठी पत्रकार संघा च्या वतीने आयोजित दर्पण रत्न राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ कार्यक्रम मलकापूर येथील मराठा मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला.सदर कार्यक्रमात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय मानांकन आयएसओ९००१२०१५ प्रमाणित हिंदी मराठी पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी दर्पण रत्न राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ चे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रमांमध्ये गेवराई तालुक्यातील ईटकुर येथील प्रतिभावंत युवा कलाकार सुदाम लिंबराज मासाळ यांना सन्मानित करण्यात आले.

या शानदार सोहळ्यात बीड जिल्ह्यातील मौजे ईटकुर येथील प्रतिभावंत युवा कलाकार सुदाम लिंबराज मासाळ यांना राज्याचेसहाय्यक माहिती आयुक्त श्री.निलेशजी तायडे साहेब यांच्या हस्ते सन्मानपत्र,स्मृती चिन्ह, शाल,श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.




महाराष्ट्र राज्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना दर्पण रत्न पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आले.दर्पण रत्न पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी निलेश तायडे सहाय्यक माहिती आयुक्त मंत्रालय मुंबई,कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.प्रा.अनिल खर्चे (प्राचार्य व्ही.बी. कोलते इंजीनियरिंग कॉलेज)तर प्रमुख पाहुणे अशांत भाई वानखेडे संस्थापक समतेचे निळे वादळ,धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी,मराठी पत्रकार संघ,बंडूभाऊ चवरे उद्योजक, बाळासाहेब दामोदर उद्योजक,दामोदर शर्मा शेतकरी नेते,विजय डागा, बंडू चौधरी,सुभेदार दिनेश तायडे कारगिल योद्धा, चंद्रकांत वर्मा हे होते. कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक, राजकीय, चित्रपट सृष्टीतील कलाकार, कला, वैद्यकीय, उद्योजक,क्रीडा अशा अनेकविध क्षेत्रातील कर्तुत्ववान व्यक्तींचा सत्कार दर्पण रत्न पुरस्कार २०२६ देऊन करण्यात आला.या कार्यक्रमाप्रसंगी देशा साठी आपल्या प्राणाची परवा न करता देशसेवा करणाऱ्या तसेच कारगिल युद्धात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सुभेदार दिनेश तायडे माजीसैनिक यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल पाटील यांनी तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण तायडे यांनी केले.ईटकुर येथील युवा कलाकार सुदाम मासाळ यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या आहेत.तसेच सुदाम मासाळ यांच्यावर मित्र परिवारासह मान्यवर मंडळींचा शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# इन्स्पायर अबॅकस नॅशनल लेव्हल स्पर्धेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**दैनिक वादळ वार्ता**
**हानुमंत चंदनकर**

सनराइज एज्युकेशन सोसायटी यांच्या इन्स्पायर अबॅकस अकॅडमी मार्फत ४ जानेवारी २०२६ रोजी कंधार येथे घेण्यात आलेल्या नॅशनल लेव्हल कॉम्पिटिशन मध्ये शिक्षिका सौ. स्वाती रातोळीकर (घोरबांड) यांच्या मार्गदर्शनाखाली कलंबरच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.या स्पर्धेत जवळपास ५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. अवघ्या पाच मिनिटांचा वेळ देऊन घेण्यात आलेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक अचूक गणिते सोडवत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.या परीक्षेत कु. सान्वी वर्ताळे (सेकंड रँक) सात्विक तुकाराम रातोळीकर (फोर्थ रँक) कु. अक्षरा मुक्कनवार (फिफ्थ रँक), कु. वीरा मुक्कनवार (सेवेन्थ रँक), विराज मुक्कनवार (नाईन रँक) व सर्वेश मुक्कनवार आणि इतर अनेक विद्यार्थ्यांनी भरघोस यश प्राप्त केले आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांना ट्रॉफी व स्मार्टवॉच देऊन गौरविण्यात आले आहे.स्वाती रातोळीकर मॅडमचे नवीन कौठा नांदेड येथे ऑनलाईन व ऑफलाईन अबॅकस आणि कोचिंग क्लास चालतात, मॅडमच्या जिद्द आणि मेहनती मुळेच त्यांच्या क्लास मधील सर्व विद्यार्थी यशस्वी झाले आहेत तसेच रातोळीकर मॅडम कडे विद्यार्थ्यांना फक्त शिक्षणच नाही तर जीवनोपयोगी संस्कार देखील मिळतात असे पालकांचे मत आहे.इन्स्पायर अबॅकस अकॅडमीच्या संचालिका व संचालक मंडळ आणि सर्व शिक्षिकांनी संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.




# डॉ.विलास पांगारकर यांच्या वाढदिवसानिमित्त पितृ छत्र हरवलेल्या सहा मुलींना प्रत्येकी ५१ हजारांची मदत

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

रंजल्या गांजल्यांना मदत करण्याबरोबरच धार्मिक कार्यातही विलास पांगारकर नेहमीच अग्रभागी असतात. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांचे विचार महाराष्ट्राच्या सोबतच महाराष्ट्राच्या बाहेर पोहोचवण्याचे काम ते आपल्या छावा भारत क्रांती मिशनच्या माध्यमातून करत आहेत. त्याचसोबत मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठीही त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून काम करणारे डॉ.विलास पांगारकर यांनी पितृछत्र हरवलेल्या सहा मुलींना प्रत्येकी ५१ हजारांची मदत करून एक आदर्श निर्माण करणारा वाढदिवस साजरा केला.




सिन्नर तालुक्यातील पांगरी येथे गुरुवारी दि.१ जानेवारी रोजी छावा मराठा क्रांती मिशनचे अधिवेशन आणि संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.विलास पांगारकर यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊंचे वंशज सिंदखेडराजा येथील शिवाजीराजे जाधव हे होते. व्यासपीठावर मनोज दादा जरांगे पाटील,छावा भारत क्रांती संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.विलास पांगारकर,भारत-पाक सीमेवर छत्रपती शिवाजी राजांचा पुतळा उभारणारे उत्तम मांढरे,विद्या वाचस्पती डॉ.रामकृष्ण महाराज लहवितकर,शनि भक्त सुखदेव महाराज, महंत डॉ.भक्ती चरणदास महाराज,छावाचे संस्थापक श्री.किशोर चव्हाण,रमेश आप्पा पांगारकर,संपत पगार, मयूर पांगारकर,विशाल पांगारकर,जगदीश पांगारकर,शिव क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष राजाभाऊ चौधरी,छावा मराठा संघटनेचे जिल्हा प्रमुख शिवाजी दादा ठोंबरे,विजय काकडे, परमेश्वर नलावडे,स्वामी जनेश्वर महाराज,विठ्ठल जपे आदींसह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# सरपंच सौ.जनाबाई काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

साबला येथील कार्यकुशल सरपंच सौ. जनाबाई नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत कार्यालय, साबला (ता. केज) येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुनील केंद्रे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती केज हे राहणार आहेत. यावेळी पत्रकार संघटनांचे पदाधिकारी, विविध वृत्तपत्रांचे संपादक, डिजिटल मीडिया प्रतिनिधी तसेच मान्यवर पाहुण्यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे, या सामाजिक जाणीवेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शिक्षण क्षेत्रात योगदान देण्याची भूमिका सरपंच सौ. जनाबाई काकडे यांनी सातत्याने जपली असून हा उपक्रम त्याचाच एक भाग आहे.या शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामपंचायत कार्यालय, साबला ता. केज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# महात्मा फुले युवा दल केज तालुका अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल विश्वास राऊत यांचा सत्कार संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई शाखा केज यांच्या वतीने महात्मा फुले युवा दल केज तालुकाध्यक्षपदी पत्रकार विश्वास राऊत यांची निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत विश्वास राऊत यांचा सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख उपस्थितीत चंद्रकांत पाटील,विजय बिक्कड, प्रदीप गायकवाड, नंदकिशोर मिसाळ, पांडुरंग कसबे,अशोक नागरगोजे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणातून विश्वास राऊत यांच्या सामाजिककार्याचा गौरव करत,महात्मा फुले युवा दलाच्या माध्यमातून युवकांना संघटित करून समाजहिताचे कार्यअधिक प्रभावीपणे करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मान्यवरांनी आपल्या भाषणात सांगितले की, महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून विश्वास राऊत यांच्या नेतृत्वाखाली केज तालुक्यात युवा दल अधिक सक्रिय व प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला.

या शुभेच्छा कार्यक्रमाचे सूत्र संचालन पांडुरंग कसबे यांनी केले,तर कार्यक्रमाच्या शेवटी नंदकिशोर मिसाळ यांनी उपस्थित मान्यवर, पत्रकार बांधव व सर्व उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमास पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# पहिल्या शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची इंदिरानगर येथे जयंती उत्साहात साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

भारतीय बौद्धमहसभा बीड अंतर्गत बोधिसत्व बुद्धविहार इंदिरानगर बीड येथे पौंश बुद्ध पौर्णिमेनिमित्त आणि आद्य शिक्षिका, पहिल्या मुख्याध्यापिका, कवयित्री सावित्रीमाई यांच्या १९५ व्या जयंती निमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्धमहसभा बीड जिल्हा पश्चिमचे अध्यक्ष महालिंग निकाळजे हे अध्यक्षस्थानी होते. ड. ओमप्रकाश गायकवाड यांनी सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर यथोचित भाषण केले. ड.हनुमंत कांबळे सावित्री माई जीवनातील काही उल्लेखनीय प्रसंगाचा उल्लेख केला.ड. चंद्रवदन जाधव यांनी सावित्रीमाई फुले यांच्या कार्या विषयी सखोल मार्गदर्शन केले. बनसोडे गोपीनाथ कोषाध्यक्ष भारतीय बौद्धमहसभा बीड तालुका यांनी पौंश बुद्ध पौर्णिमेचे महत्व आणि आद्य पहिल्याशिक्षिका,पहिल्या मुख्याध्यापिका, कवयित्री सावित्रीमाई फुले जीवनातील काही उल्लेखनीय प्रसंगाचा उल्लेख विशद केले.तसेच लहान मुला मुलींनी सावित्री माई फुले यांच्या जयंती तथा बालिका दिनानिमित्त कु. रमा जावळे, शितल जावळे, स्वरा जावळे ,कबीर जवळे , राणी धनवे, अंजली धनवे , सुमित्रा ससाणे, छकुली साबळे, या सर्व बालकांनी सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमित्त अतिशय कौतुकास्पद आपल्या भाषेत भाषणे केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गौतम खेमाडे आमचे जिवलग स्नेही यांनी केले. अध्यक्षीय समारोप या कार्यक्रमाचे सन्माननीय अध्यक्ष तथा भारतीय बौद्धमहसभा बीड जिल्हा पश्चिम अध्यक्ष महालिंग निकाळजे यांनी अतिशय उत्तमप्रकारे पौंश बुद्ध पौर्णिमेचे महत्व अतिशय विस्तृत रूपात स्पष्ट केले.या कार्यक्रमासाठी शिंदे सोनाजी जावळे गौतम ,सुनील समुद्रे ,हरिभाऊ साळवे, संपत्ती वीर , मीना वालेकर , मीना घोडके , यशोदा बोरुडे तसेच बोधिसत्व बुद्धविहार इंदिरानगर बीड येथील बौद्ध उपासक आणि उपासिका बालक तथा बालिका यांची उपस्थिती होती .या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ससाणे राजेंद्र अध्यक्ष भारतीय बौद्धमहसभा बीड तालुका यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंदिरा नगर बीड येथील बौद्ध उपासक आणि उपासिका यांनी अथक परिश्रम घेतले.शेवटी सरनतय घेऊन या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




# ॲड.अक्षय अनिल चाटे यांचे ऑल इंडिया बार परीक्षेत सुयश

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्याचे सुपुत्र ॲड.अक्षय अनिल चाटे यांनी नुकतीच पार पडलेली ऑल इंडिया बार एक्झामिनेशन (-श्रश्र खपवळर इरी एराळपरींळेप) यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.देशपातळी वरील या महत्त्वाच्या व प्रतिष्ठित परीक्षेत मिळवलेले यश हे त्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि चिकाटीचे फलित आहे.ऑल इंडिया बार परीक्षा उत्तीर्ण होणे हे देशभरात वकिली व्यवसाय करण्यासाठी अत्यावश्यक मानले जाते. ही परीक्षा कायद्याचे सखोल ज्ञान,व्यावहारिक कौशल्य आणि व्यावसायिक नैतिकतेची कसोटी पाहणारी असते. या कठीण परीक्षेत यश मिळवून अक्षय चाटे यांनी आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली आहे.अक्षय चाटे यांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर सातत्याने अभ्यासावर भर दिला.वरिष्ठ वकिलांचे मार्गदर्शन,नियमित सराव आणि आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले.त्यांच्या या यशाबद्दल केज तालुक्यातील नागरिक, मित्रपरिवार,नातेवाईक तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या यशामुळे केज तालुक्यातील युवकांना प्रेरणा मिळाली असून, कायद्याच्याक्षेत्रात करिअर करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अक्षय चाटे हे प्रेरणास्थान ठरत आहेत.भविष्यात समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या बळकटीसाठी ते निष्ठेने कार्य करतील,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.ॲड.अक्षय अनिल चाटे यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल आई उर्मिला चाटे,वडील अनिल चाटे, बहिण पूजा चाटे,शिल्पा चाटे,मामा दिनकर मुंडे (एरिया मॅनेजर एमआयडीसी छत्रपती संभाजीनगर) वडमाऊली लोकविकास मंचचे संस्थापक भास्कर मुंडे, बंधू लोकमंच प्राईम न्यूजचे संपादक विजय बिक्कड,डॉ.प्रदीप मुंडे, गणेश मुंडे,यश मुंडे मित्रपरिवार व नातेवाईक सर्व स्तरातून अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077